



## वेचक । वेधक

### श्रीनगरमध्ये दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या रणबीरगडमध्ये भारतीय जवानांच्या कारवाईला मोठे यश आले आहे. भारतीय जवानांनी चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. यात लष्कर-ए-तोयबाचा कमांडर इश्फाक रशीद खान आणि एजाज यांचा समावेश आहे. रणबीरगड येथे दहशतवादी लपून बसल्याची माहिती लष्कराला मिळाली होती. त्यानंतर लष्कराची २९ राष्ट्रीय रायफलसची तुकडी आणि सीआरपीएफच्या जवानांनी एकत्रितपणे दहशतवादी ज्या जागी लपले होते, त्या परिसराला वेढा दिला. याची चाहूल लागताच दहशतवाद्यांनी जवानांवर अंदाधूंद गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्यानेही गोळीबार केला. या चकमकीत दोन दहशतवाद्यांचा मृत्यू झाला आहे. चकमकीत भारताचा एक जवानही जखमी झाला आहे. त्याला लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### अमेरिकी न्यायालयाने फेटाळला राणाचा जामीन अर्ज

**वॉशिंग्टन** : मुंबईवरील २६/११ रोजीच्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या कटातील एक सूत्रधार असलेल्या तहव्वूर राणाचा जामीन अर्ज अमेरिकेतील न्यायालयाने फेटाळून लावला. पाकिस्तानी नागरिक असलेल्या राणाने जामिनासाठी साडेदहा लाख डॉलर्सची हमी देऊ केली होती. भारत सरकारने यापूर्वी त्याला फरार घोषित केले आहे. त्याला १० जून रोजी लॉस एंजेलिस येथे पोलिसांनी अटक केली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यातील त्याचा सहभाग सिद्ध झाल्यानंतर आरोपी प्रत्यार्पण करारांतर्गत भारताने त्याचा ताबा मागितल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती.

# चिनी सैन्य हटल्याशिवाय माघार नाही

## भारतीय लष्कर आक्रमक



**नवी दिल्ली** : सीमेवरून पूर्णत: माघार घेण्याची तयारी चीनने राजनयिक पातळीवरील चर्चेत दर्शवली असली, तरी यावर आमचा विश्वास नाही. चीनचे सैनिक जोपर्यंत संपूर्ण माघार घेणार नाही, तोपर्यंत आम्ही आपली जागा सोडणार नाही, अशी आक्रमक भूमिका भारतीय लष्कराने शनिवारी घेतली.

लष्कराच्या उत्तर कमांडचे प्रमुख असलेले लेफ्टनंट जनरल योगेशकुमार जोशी यांनी लष्कराची भूमिका स्पष्ट केली. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून चिनी सैन्य मागे हटण्याच्या स्थितीत दिसत नसल्याने, भारतीय लष्कराने आता जय्यत तयारी सुरू केली आहे. हा भाग दुर्गम आणि प्रतिकूल हवामानाचा असल्यामुळे तिथे विशेष काळजी घ्यावी लागते. सर्व स्थितीचा अंदाज घेऊन लष्कराने साधनसामग्री जमा करायला सुरुवात केली आहे, असे त्यांनी सांगितले. गरम कपडे, इंधन, अन्नधान्य, तंबू, अत्यावश्यक औषधे आदी सामग्री जवानांसाठी पाठवली जात आहे. सर्व पातळ्यांवर चर्चा करूनही चीनचे सैन्य माघारी घेत नसेल, तर भारतीय जवानही आपली जागा सोडणार नाही. कुठल्याही दबावाला बळी न पडता आम्ही आवश्यक ती सर्व तयारी करत असल्याचे ते म्हणाले.

> १५ जुलै रोजी राजनयिक पातळीवर झालेल्या बैठकीनंतर चीनच्या सैनिकांनी परिपूर्ण माघार घ्यायला हवी होती, पण तसे झाले नाही. उलट, या देशाने आणखी सैन्य तैनात करण्यास सुरुवात केली. अशा देशावर आम्ही कदापि विश्वास ठेवणार नाही.
>
> — **योगेशकुमार जोशी,** लष्कराचे उत्तर कमांडचे प्रमुख

# मोदींच्या घरासमोरही करणार आंदोलन

## राजस्थान मुख्यमंत्र्यांचे आमदारांना तयार राहण्याचे आवाहन

**नवी दिल्ली** : राजस्थानात सुरू असलेल्या सत्तासंघर्षा दरम्यान राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत आपले सरकार वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसत आहेत. याच दरम्यान गेहलोत यांनी विधिमंडळाची एक बैठकही घेतली. यामध्ये आपली राष्ट्रपतीच काय तर पंतप्रधानांच्या घरीही धडक देण्याची तयारी असल्याचे गेहलोत यांनी यावेळी आमदारांना सांगितले.

सगळ्यांनी तयार राहा. २१ दिवस येथे बसावे लागले तरी बसून राहू... राष्ट्रपती भवन जायला लागेल तर राष्ट्रपतींकडेही जाऊ, नाहीतर पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर दिल्लीत आंदोलन करावे लागले तर तेही करू, असे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी म्हटले आहे. जयपूरच्या फेयरमॉन्ट हॉटेलमध्ये कॉंग्रेस नेत्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

> **कितीही वेळ लागला तरी विजय आमचाच**
>
> आम्हाला न्यायालयाकडून किंवा राज्यपालांकडून कोणताही न्याय मिळत नसल्याचे दिसत आहे. हे मोठं संकट आहे पण कितीही वेळ लागला तरी विजय आमचाच आहे. आमच्याकडे आमदार आहेत. आम्ही आमचे कामकाज सुरूच ठेवू. ज्या आमदारांना जिथे जायच आहे तिथे ते जातील पण परत हॉटेलमध्ये परततील. सचिन पायलट भाजपच्या या खेळात सहभागी आहेत आणि हा संपूर्ण खेळ भाजपच्याच इशाऱ्यावर सुरू आहे, असे परिवहन मंत्री खाचरियावास यांनी म्हटले आहे.

# वेगवान कोविड चाचणीसाठी भारत-इस्राईल एकत्र

**जेरुसलेम** : तीस सेकंदात घेता येणारी करोना चाचणी विकसित करण्यासाठी भारत आणि इस्राईल-मधील शास्त्रज्ञ एकत्र आले आहेत. इस्राईलची तंत्रकुशलता आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याची भारताची क्षमता या वैशिष्ट्यांना याद्वारे एकत्र आणण्यात आले आहे. इस्राईलचे एक उच्चस्तरीय पथक लवकरच यासाठी भारतात येणार असून ते अंतिम टप्प्यातील चाचणी घेणार आहेत.

इस्राईलच्या संरक्षण संशोधन आणि विकास संचालनायाचे (डीडीआर अँड डी) एक पथक येत्या काही दिवसात दिल्लीत पोहोचणार असून ते वेगवान चाचणी विकसित करण्यासाठी ते भारतातील 'डीआरडीओ'ला सहकार्य करतील, असे निवेदन इस्राईलच्या संरक्षण मंत्रालयाने प्रसिद्ध केले आहे.

या प्रकल्पात इस्राईलचा परराष्ट्र विभाग आणि आरोग्य मंत्रालयही सहभागी आहे. भारतात येणारे हे पथक वेगवान चाचणी चाचण्यांची परिणामकारकता तपासून पाहण्यासाठी अनेक अंतिम टप्प्यातील चाचण्या घेतील, असे यामध्ये सांगितले आहे. संसर्गाला सुरुवात झाल्यापासून 'डीडीआर अँड डी'ने अनेक चाचणी तंत्रज्ञा-नाचे प्रयोग केले आहेत. यातील अनेक प्रयोग पुढील टप्प्यातही गेले आहेत. मात्र, त्यांची परिणा-मकारकता तपासून पाहण्यासाठी मोठ्या संख्येने रुग्णांवर अशी चाचणी घेणे आवश्यक आहे. त्यासाठीच भारताबरोबर सहकार्य करणार असल्याचे इस्राईलने सांगितले.

इस्राईलचे चाचणी तंत्रज्ञान रुग्णाच्या आवाजाची आणि श्वासाची तपासणी करणार आहे, तसेच आयसोथर्मल आणि पॉलिअमायनो ॲसिड चाचणीही केली जाणार आहे.

## निकटवर्तीयांना विलगीकरणात रहाण्याचे केले आवाहन

# शिवराज सिंह चौहान यांना करोना



**भोपाळ** : मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना करोनाची लागण झाली आहे. चौहान यांनी स्वत: ट्विट करून याबाबतची माहिती दिली. चौहान ट्विटमध्ये म्हणाले, माझ्यात करोनाची लक्षणे दिसून येत होती. करोनाची चाचणी घेतल्यानंतर माझा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. माझ्या सर्व सहकाऱ्यांना मी अवाहन करतो की त्यांनी आपली कोविड-१९ चाचणी करून घ्यावी. शिवाय माझ्यासोबत संपर्क आलेल्या निकटवर्तीयांनी विलगीकरणात रहावे.


कोविड-१९ वर लवकरात लवकर उपचार झाल्यास व्यक्ती पूर्णपणे बरा होतो. मी २५ मार्चपासून दररोज करोना संक्रमण स्थितीची पुनरावलोकन बैठक घेत आलो आहे. मी यापुढे व्हिडिओ परिषदेद्वारे करोनाचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न करीन, असेही ते म्हणाले. माझ्या अनुपस्थितीत ही बैठक आता गृहमंत्री डॉ. नरोट्टा मिश्रा, नागरी विकास आणि प्रशासन मंत्री भूपेंद्र सिंह, आरोग्य शिक्षा मंत्री विश्वास सारंग आणि आरोग्य मंत्री डॉ. पी.आर. चौधरी घेतील. मी स्वत:ही उपचारादरम्यान कोविड-१९ वरील नियंत्रणासाठी शक्य ते प्रयत्न करीन, अशी माहिती चौहान यांनी दिली.

दरम्यान, मध्ये प्रदेशात आतापर्यंत २५ हजारांपेक्षा अधिक करोनाबाधित सापडले आहेत. तर आतापर्यंत ७८० लोकांचा करोना विषाणूने बळी घेतला आहे. समाधानाची बाब म्हणजे आतापर्यंत १७ हजारांपेक्षाही अधिक लोकांनी करोनावर मात केली आहे.

> **देशवासीयांनो, सावधानता बाळगा!**
>
> मी करोना संसर्ग पसरू नये यासाठी नियमांचे काटेकोर पालन करत आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार स्वत:ला विलगीकरणात ठेवून उपचार घेईन. माझे मध्य प्रदेशच्या जनतेसह देशालाही आवाहन आहे की सावधानता बाळगा, थोडाही बेजबाबदारपणा करोनाला निमंत्रण देऊ शकतो. मी करोनापासून वाचण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले, पण आपली समस्या घेऊन लोक मला भेटायला यायचे. त्यामुळे त्यांना भेटणे मला अनिवार्य होते. मला ज्या कोणी लोकांनी भेट दिली, त्या सर्वांनी आपली कोविड-१९ चाचणी करून घ्यावी, असे शिवराज सिंह चौहान म्हणाले.

# दिवसभरात ४९ हजारांहून अधिक नवे रुग्ण

## चोवीस तासांत ७४० जणांचा मृत्यू



**नवी दिल्ली** : देशात करोनाबाधित रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून लॉकडाऊन असतानाही रुग्णसंख्येत मोठी वाढ दिसत आहे. गेल्या चोवीस तासांत देशातील करोनाग्रस्त रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. एकाच दिवसात तब्बल ४९,३१० नवीन करोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. आजपर्यंतचा एका दिवसांतील रुग्णवाढीचा हा सर्वात मोठा आकडा आहे. या रुग्णांसह देशातील एकूण करोना संक्रमित रुग्णांची संख्या १२ लाख ८७ हजार ९४५ पर्यंत पोहोचली आहे. त्यामध्ये, ८ लाख १७ हजार २०८ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सकाळी ८ वाजता जारी केलेल्या आकडेवाडीनुसार देशात गेल्या २४ तासांत करोनामुळे तब्बल ७४० लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मृतांच्या संख्येत वाढ होऊन आजपर्यंत एकूण मृतांची संख्या ३०,६०१ एवढी झाली आहे. सद्यस्थितीत देशात ४ लाख ४० हजार १३५ करोनाबाधित रुग्ण असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तर, आत्तापर्यंत ६३.४५ टक्के रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. त्यामध्ये विदेशी नागरिकांचाही समावेश आहे.

# चीन अणू केंद्रातील ९० वैज्ञानिकांचा राजीनामा

## सरकारचा दबाव; सुविधा मिळत नसल्याचा आरोप

**बिजिंग** : चीनची सर्वात मोठी सरकारी अणू ऊर्जा सुरक्षा तंत्रज्ञान संस्थे (आयनेस्ट)मधील ९० अणू शास्त्रज्ञांनी राजीनामे दिले आहेत. त्यामुळे चीनच्या अडचणी वाढल्या असून यासंबंधी तपास करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सुमारे ५०० सदस्यांच्या सोबत काम करणाऱ्या संस्थेत गेल्या वर्षी २०० शास्त्रज्ञांनी राजीनामे दिले होते. आता येथे १०० हून कमी लोक आहेत. आता ही संस्था चालवणे खूप कठीण झाले आहे.

वैज्ञानिकांनी राजीनामे देण्याची कारणे वेगवेगळी सांगितली जात आहेत. यात वैज्ञानिकांना मिळणारे वेतन आणि त्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या सरकारी सुविधा हे प्रमुख कारण आहे. चीन कम्युनिस्ट पक्षाने या संस्थेवर आपला पूर्ण अधिकार दाखवला आहे. पक्षाचे मोठे नेते या वैज्ञानिकांकडून जबरदस्ती काम करून घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> **आयनेस्ट चीनमधील खूप महत्त्वाची संस्था असून तिने २०० हून अधिक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रकल्पात सहभाग घेतला आहे. चीनने १९५० मध्ये अणू कार्यक्रम सुरु केला. त्यांच्याकडे सुमारे ३०० हून अधिक अण्वस्त्रे तयार आहेत. दरम्यान, त्यांच्या विस्तारवादी धोरणाला अमेरिका, ब्रिटन, जपान आणि ऑस्ट्रेलिया मिळून अनेक देशांनी आव्हान दिले आहे. चीनच्या अध्यक्षांना अण्वस्त्रे हल्ला करण्याचे आदेश देण्याचे अधिकार नाहीत. ते पॉलिट ब्यूरोला आहेत. जिनपिंग दोन्ही आघाड्यांवर लढत आहेत. शास्त्रज्ञांचे राजीनामे हा त्या दबावाचाच एक भाग आहे.**

# राज्य वार्ता

## करोनाचा धोका टाळण्यासाठी सावधगिरी बाळगा : ढवळीकर

**प्रतिनिधी । गोवन वार्ता**

**फोंडा** : करोना महामारीचा धोका टाळण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने सावधगिरी बाळगून प्रतिका-रशक्ती वाढवण्यासाठी आवश्यक तेवढे प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन आमदार सुदिन ढवळीकर यांनी केले.

आयुष्य मंत्रालय व माधवराव ढवळीकर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कुंडईतील नागरिकांना करोनाशी संबंधित प्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या गोळ्या वितरित केल्यानंतर ढवळीकर बोलत होते. याप्रसंगी कुंडईचे उपसरपंच मोहन गावडे, पंच सदस्य विश्वास फडते, सर्वेश जल्मी, संचिता परवार तसेच माधवराव ढवळीकर ट्रस्टचे संचालक मिथिल ढवळीकर उपस्थित होते.



कुंडईतील नागरिकांना गोळ्यांचे वाटप करताना सुदिन ढवळीकर.

# नवीन तंत्रज्ञानाद्वारे अपत्यप्राप्ती यशस्वी

## उत्तर कर्नाटकात प्रथमच प्रयोग सफल

**बेळगाव** : अपत्य नसलेल्या दाम्पत्यांसाठी गोड बातमी असून, प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक डायग्नोसिस या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने लग्नाच्या १४ वर्षांनंतर एका दाम्पत्याला मूल झाले आहे. गोकाक येथील ३२ वर्षीय महिलेवर आयव्हीएफचे तीन प्रयोग मिळून फलित होण्याचे ८ प्रयत्न असफल ठरल्यानंतर तिने सदृढ बालकाला जन्म दिला आहे.

नामवंत स्त्रीरोगतज्ज्ञ व आयव्हीएफ स्पेशालिस्ट डॉ. शोभना पट्टेद, ज्या गोव्यातही प्रसिद्ध आहेत, यांनी आपल्या चमूच्या साह्याने पट्टेद्स फर्टिलिटी अँड रिसर्च सेंटरमध्ये सफल प्रयोग करून मूल नसलेल्या दाम्पत्याच्या झोळीत आनंद भरला. महिलेची सखोल चाचणी केली असता, वारंवार रोपण असफल (रिकरंट इम्प्लांटेशन फेल्युर) होत असल्याचे निदान झाले. प्रीइम्प्ला-टेशन जेनेटिक डायग्नोस्टिकच्या साह्याने तिच्यावर आधुनिक उपचार करण्यात आले. गर्भाशयातील टिश्यूद्वारे एलिस अँड एम्मा चाचणी करण्यात आली. एक युप्लॉइड एम्ब्रियो पाठवून केलेला प्रयोग सफल झाल्यानंतर तिने एका ३.८ किलो वजनाच्या पुत्राला जन्म दिला, अशी माहिती डॉ. पट्टेद यांनी दिली.



डॉ. शोभना पट्टेद

रिकरंट इम्प्लांटेशन फेल्युर एक आव्हान होते. अत्याधुनिक तंत्र असूनही गर्भधारणेचे प्रमाण कमी राहते. यासाठी उच्च दर्जाचा गर्भ, पोषक एन्डोमेट्रियम आणि सुयोग्य बदली प्रक्रिया आवश्यक असते, असे पट्टेद्स सेंटरच्या मुख्य सल्लागार व आयव्हीएफ स्पेशालिस्ट डॉ. पट्टेद यांनी सांगितले. प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक टेस्टिंग फॉर एन्यूप्लॉयडी (पीजीटी-ए) बद्दल माहिती देताना त्या म्हणाल्या, अशा प्रकारचा प्रयोग उत्तर कर्नाटकात प्रथमच करण्यात आला आहे. रोपण करण्याची सर्वाधिक शक्यता असलेल्या एम्ब्रियोची (गर्भ) निवड यात केली जाते, जेणेकरून गर्भधारणा आणि सदृढ बालकाची शक्यता अधिक असते. एम्ब्रियो बायोप्सी प्रक्रियेसाठी कौशल्य आणि अनुभव असलेल्या एम्ब्रियो-लॉजिस्टसह अत्याधुनिक प्रयोगशा-ळेची आवश्यकता असते. वारंवार रोपण (रिकरंट इम्प्लांटेशन फेल्युर) व आयव्हीएस असफल होणाऱ्या ३५ वर्षांवरील महिलांना या तंत्राचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो, असे पट्टेद्स सेंटरचे मुख्य एम्ब्रियोलॉजिस्ट डॉ. महादेव स्वामी यांनी सांगितले. गरजू दाम्पत्यांनी ९८४५२७३९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.




**IN THE COURT OF THE DEPUTY COLLECTOR/ SUB DIVISION OFFICE AT SATTARI - GOA**

CASE No 8-169-2019-Part-Sat

1.Sanjay Dadu Sawant, H.No.103 W.No.7, Valpoi,Sattari-Goa. ...Applicants

V/S

1.Yeshwant Bablo Pirankar, Velguem, Sattari-Goa. ....Opponents

To,

1. Yeshwant Bablo Pirankar 2. Madhukar Raglo Gawde 3. Padmavati Sambhaji Sawant 4. Vilas Shantaram Sawant 5. Sanju Pandurang Desai. 6. Rajashree Gangaram Kalekar 7 Smt Madhuri Madhuker Gawde

**PUBLIC NOTICE**

WHEREAS, the above named applicant has moved an application to this Court for Partition of HIS/HER/ THEIR/ITS share under section 61 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed under Survey No. 23/2 of Velguem Village in Sattari Taluka admeasuring an area of 310 sq. mts.

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the Co-owners of the said survey number.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficient Address," etc.

AND WHEREAS, the applicant has made an application on 03-Feb-2020 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as thii, applints has stated their inability to submit the detailed addresses of the above opponents and 'their legal heirs.

AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.

NOW THEREFORE, notice is hereby given again to all the above opponents and all interested parties to appear on17-Aug-2020 at 11:00 AM to file their say on the said date and time, failing which the matter will be heard and determined in their absence.

Given under my hand and the seal of this Court on this the 3rd day of February 2020.

Sd/-
(Mangaldas Budho Gaonkar)
Deputy Collector & SDO
Sattari-Goa

Seal

**IN THE COURT OF THE DEPUTY COLLECTOR/ SUB DIVISION OFFICE AT SATTARI - GOA**

CASE No.8-168-2019-Part-Sat

1.Rajashree Gangaram Kalekar, H.No.354, Assoi Dongri, Near Airport, Dabolim Vasco Goa ......Applicants

V/s

1.Yeshwant Bablo Pirankar, Velguem Sattari Goa ......Opponents

To,

1. Yeshwant Bablo Pirankar, Velguem Sattari Goa 2. Madhukar Raglo Gawde, Bimbal Khotodem. Sattari Goa 3. Padmavati Sambhaji Sawant, Patwal Velguem Sattari Goa 4. Vilas Shantaram Sawant, Patwal Velguem Sattari Goa 5. Sanju Pandurang Desai, Patwal Velguem Sattari Goa 6. Sanjay Dadu Dessai, Patwal Velguem Sattari Goa 7. Smt Madhuri Madhuker Gawde,Bimbal Khotodem, Sattari Goa

**PUBLIC NOTICE**

**WHEREAS,** the above named applicant has moved an application to this Court for Partition of HIS/HER/ THEIR/ITS share under section 61 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed under Survey No. 23/2 of Velguem Village in Sattari Taluka admeasuring an area of 315 sq. mts.

**AND WHEREAS,** applicant served the notices through Registered A.D to the Co-owners of the said survey number.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficient Address," etc.

**AND WHEREAS,** the applicant has made an application on 03-Feb-2020 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicants has stated their inability to submit the detailed addresses of the above opponents and their legal heirs.

**AND WHEREAS,** I am satisfied that this is a fit case for grant of such permission.

**NOW THEREFORE,** notice is hereby given again to all the above opponents and all interested parties to appear on 17 Agu-2020 at 11:00 AM to file their say on the said date and time, failing which the matter will be heard and determined in their absence.

Given under my hand and the seal of this Court on this the 3rd day of February 2020.

Sd/-
(Mangaldas Budho Gaonkar)
Deputy Collector & SDO,
Sattari-Goa

Seal

**IN THE COURT OF THE DEPUTY COLLECTOR/ SUB DIVISION OFFICE AT SATTARI - GOA**

CASE No.8-16-2020-part-sat

1.Sukanya Sunil Salunke, Flat No.1/A/S1, Salunke Estates, Vasant Nagar, Harvalem, Bicholim Goa ...Applicants

V/S

1. Shri Sunil Suresh Salunke, Flat No.1/A/ S1, Salunke Estates, Vasant Nagar, Harvalem, Bicholim Goa ....Opponents

To,

1. Shri Sunil Suresh Salunke, Flat No.1/A/ S1, Salunke Estates, Vasant Nagar, Harvalem, Bicholim Goa 2 Riyaz Ahmed Khan,H.No.100, Old Nanus, Valpoi Sattari-Goa. 3 Alsefa Riyaz Khan,H.No.100, Old Nanus, Valpoi Sattari-Goa

**PUBLIC NOTICE**

WHEREAS, the above named applicant has moved an application to this Court for Partition of HIS/HER/THEIR/ITS share under section 61 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed under Survey No. 11/7 . 11/7 , 11/7 , 11/7 of Cudcem Village in Sattari Taluka admeasuring an area of 7010 sq. mts.

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the Co-owners of the said survey number.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficient Address," etc.

AND WHEREAS, the applicant has made an application on 16-Jul-2020 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as thii, applints has stated their inability to submit the detailed addresses of the above opponents and their legal heirs.

AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.

NOW THEREFORE, notice is hereby given again to all the above opponents and all interested parties to appear on17-Aug-2020 at 11:00 AM to file their say on the said date and time, failing which the matter will be heard and determined in their absence.

Given under my hand and the seal of this Court on this the 20th day of July 2020.

Sd/-
(Mangaldas Budho Gaonkar)
Deputy Collector & SDO
Sattari-Goa

Seal

**कोर फूडस् लिमिटेड**

(पूर्वी फिल कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)
सीआयएन: एल३३२०८जीए१९८३पीएलसी०००५२०
नोंदणीकृत कार्यालय: व्हिजन हाऊस, थिविम् इंडस्ट्रियल इस्टेट, म्हापसा गोवा- ४०३५२६ टेलिफोन: +९१-०८३२-२२५७७२१
ईमेल आयडी: companysecretary@korefoods.in
वेबसाईट: www.korefoods.in

**सार्वजनिक सूचना**

कोर फूडस् लिमिटेडच्या शेअर्सधारकांसाठी (फोटोफोन इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड/फिल कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून पूर्वी ओळखले जाणारे)

कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय (एमसीए) परिपत्रक क्रमांक २०/२०२० दिनांकित ०५.०५.२०२० आणि सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) परिपत्रक क्रमांक एसईबीआय / एचओ / सीएफडी / सीएमडी १ / सीआयआर / पी /२०२०/७९ दिनांकित १२.०५.२०२० रोजी प्रचलित कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर सूचीबद्ध कंपन्यांना भौतिक प्रति पाठविण्यातील अडथळे लक्षात घेता २०२० च्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आणि वार्षिक अहवाल भागधारकांना केवळ ईमेलच्या माध्यमातून पाठविण्याची परवानगी दिली आहे.

वर नमूद केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने आम्ही आपल्याला पुढील माहिती देतो:

१. कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत आयोजित केली आहे.
२. वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११.३० वा. आयोजित केली आहे.
३. कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस www.korefoods.in या कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल.
४. ज्या सदस्यांनी भौतिक स्वरुपात शेअर्स घेतलेले आहेत किंवा ज्या सदस्यांनी कंपनीसोबत त्यांची ईमेल पत्ता नोंदणी केलेली नाही, ते रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मत नोंदवू शकतात. याचे निर्देश वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसीत उपलब्ध असतील.
५. इलेक्ट्रॉनिक स्वरुपात शेअर होल्डर्सकडे वार्षिक अहवाल, नोटीसा आणि इतर संप्रेषणे पाठविण्यासाठी, आम्ही कोर फूडस् लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांना विनंती करतो की ज्यांनी नोंदणी केलेली नाही / आपला ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर अपडेट केलेला नाही, त्यांनी खालील पत्त्यावर कंपनीच्या रजिस्ट्रार आणि हस्तांतरण एजंट (आरटीए) च्या संवादाद्वारे भौतिक स्वरुपात किंवा डीमॅट फॉर्ममध्ये असलेल्या समभागांच्या संदर्भात तात्काळ नोंदणी करणे:

**डेटामॅटिक्स बिझनेस सोल्यूशन्स लिमिटेड प्लॉट क्र. बी-५, पार्ट बी क्रॉसलेन, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३**

ई-मेल: investorsqry@datamaticsbpm.com

कोर फूडस् लिमिटेडसाठी

सही/-
**पूजा जोशी**
कंपनी सचिव अधिक अनुपालन अधिकारी
दिनांकित: २६/०७/२०२०
ठिकाण: म्हापसा, गोवा.